ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख २७ मार्च, १९५७ | अंक १३

## विविध माहिती

**व्यापारी कराराची आवश्यकता**—सध्यां भारताच्या दौऱ्यावर असलेल्या अमेरिकन व्यापारी प्रतिनिधींनीं आपल्या सरकारला एक अहवाल पाठविला आहे. उभयता देशांमधील व्यापाराची वृद्धि होण्यासाठीं एका व्यापारी व जलवहातुक कराराची आवश्यकता अहवालांत प्रतिपादन करण्यांत आली आहे.

**वांशिक राष्ट्रिकांचा नकाशा**—भारत, पाकिस्तान, सीलोन व नेपाळ ह्या देशांतील वांशिक राष्ट्रिकांचा नकाशा सोव्हिएट रशिआंतील वंशशास्त्रज्ञांनीं तयार केला आहे. ह्या नकाशांत १५० वांशिक राष्ट्रिकांचा मूळप्रदेश दाखविण्यांत आला आहे. सर्व जगांतील मानववंशांचा अशाच प्रकारचा नकाशाहि तयार करण्यांत येत आहे.

**सीरिआला झेकोस्लोव्हाकिआची मदत**—झेकोस्लोव्हाकिआंतील एका औद्योगिक संघटनेनें सीरिआंत तेल शुद्ध करण्याचा कारखाना उभारण्याचें काम घेतलें आहे. सीरिआच्या सरकारनें तत्संबंधींच्या कराराला मंजुरी दिली आहे. कारखाना उभारण्यासाठीं ६ कोटी सीरिअन पौंड भांडवल लागेल व त्यांत दरसाल ७,५०,००० लाख टन तेल शुद्ध केलें जाईल.

**अणुशक्तीचा शांततामय उपयोग**—अमेरिकेच्या भारतामधील माहितीखात्यानें पुरस्कृत केलेलें अणुशक्तीविषयक प्रदर्शन ग्वाल्हेर येथें खुलें करण्यांत आलें आहे. प्रदर्शनांत अणुशक्तीचा शांततामय उपयोग कसा होतो तें दाखविलें आहे. गेल्या ऑगस्टमध्यें मुंबईत उद्‌घाटन केलेल्या अणुभट्टीची एक प्रतिकृतीहि प्रदर्शनांत ठेवण्यांत आली आहे.

**रशिआचें सागरी सामर्थ्य**—रशिआंतील नौदलांत सध्यां ४७५ पाणबुड्या असून त्यांच्या संख्येंत दरसाल ७० नव्या पाणबुड्यांची भर पडत आहे. शिवाय समुद्राच्या पृष्ठभागावर संचार करणारीं ३० क्रूझर्सहि रशिआजवळ आहेत. ह्या बोटी अशाच प्रकारच्या ब्रिटिश बोटींच्यापेक्षा अद्यावत् पद्धतीच्या आहेत.

**श्री. श्रॉफ ह्यांची टीका**—मुंबईचे प्रमुख उद्योगपति श्री. ए. डी. श्रॉफ ह्यांनीं सरकारच्या आर्थिक धोरणावर टीका केली आहे. आर्थिक उद्दिष्टें साध्य करण्यासाठीं सरकारनें समाजवादी उपायांचा अवलंब केला आहे. पण ह्या उपायांमुळें अखेरीस देशाचें नुकसानच होईल, असें मत त्यांनीं व्यक्त केलें आहे.

**कामगारांना बोनस**—कोइमतूर येथील दक्षिण भारतीय गिरणीसंघानें आपल्या कामगारांना ४ वर्षांचा बोनस म्हणून १३॥ महिन्यांचा पगार देण्याचें ठरविलें आहे. कामगार संघटना व गिरणीमालक ह्यांच्यांत बोनससंबंधीं तंटा चालू होता.

**कॉफीची निर्यात**—१९५६-५७ सालच्या हंगामांत कॉफीचें जितकें पीक येईल त्यापैकीं ११,०५० टन कॉफी निर्यातीसाठीं मंजूर करण्यांत आली आहे. १९५७ सालीं देशांतील गरज भागविण्यासाठीं २५,८१० टन कॉफी राखून ठेवण्यांत आली आहे. अशी माहिती लोकसभेंत व्यापार व उद्योगमंत्री श्री. देसाई ह्यांनीं सांगितली.

**वज्रेश्वरी येथील उन्हाळी**—ठाणें जिल्ह्यांत वज्रेश्वरी येथें गरम पाण्याचीं कुंडें आहेत. ह्या कुंडांचा उपयोग लोकांच्या आरोग्यासाठीं करण्याची योजना मुंबई सरकारनें आखली आहे. कुंडांतील पाणी उंचावरील टाकींत चढवून तेथून नळाच्या साह्यानें तें स्नानगृहांत पोंचविण्यांत येईल.

**इंजिनिअरांना परदेशांत शिक्षण**—भारतांत काढण्यांत येणाऱ्या निरनिराळ्या लोखंड व पोलादाच्या कारखान्यांतून कामें करण्यासाठीं ९० इंजिनिअर्सना उच्च शिक्षण घेण्यासाठीं रशिआंत पाठविण्यांत आलें आहे. त्याशिवाय आणखी ८० इंजिनिअर्सना पश्चिम जर्मनींत पाठविण्यांत आलें आहे.

**मराठवाड्यांतील धरण**—मराठवाड्यांतील परभणी जिल्ह्यांत पूर्णा नदीवर धरण बांधण्याच्या योजनेला मुंबई सरकारनें मंजुरी दिली आहे. धरणासाठीं सुमारें ५॥ कोटी रुपये खर्च येईल व त्यामधील पाण्यानें १,६०,००० एकर जमिनीला पाण्याचा हुकमी पुरवठा होईल.

**भारत-तिबेट वैमानिक प्रवास**—भारत व तिबेट ह्यांच्या दरम्यान नियमितपणें प्रवाशांची वैमानिक वहातूक लवकरच सुरू करण्यांत येणार आहे. चिनी अधिकाऱ्यांनीं पश्चिम तिबेटमध्यें आणखी दोन विमानतळ बांधण्याचें काम सुरू केलें आहे. तिबेटमधील पहिला विमानतळ ल्हासाच्या पूर्वेस १०० मैलांवर नुकताच बांधण्यांत आला आहे.

**जनता आयुर्विमा पॉलिसी**—वेताची प्राप्ति असलेल्या लोकांना आयुर्विम्याचा फायदा घेतां यावा म्हणून आयुर्विमा कॉर्पोरेशननें ' जनता पालिसी ' हा नवा प्रकार सुरू करण्याचें ठरविलें आहे. ही पॉलिसी कमींत कमी २५० रुपयांची व जास्तींत जास्त १००० रुपयांची असेल. ती घेतांना विमेदाराची वैद्यकीय तपासणी करण्यांत येणार नाहीं.

**शारीरिक शिक्षणासाठीं शिष्यवृत्त्या**—शारीरिक शिक्षण घेण्यासाठीं परदेशांत जाऊन अभ्यास करतां यावा म्हणून भारतीय सरकारनें दरसाल ४ शिष्यवृत्त्या देण्याचें ठरविलें आहे. परदेशांतील वास्तव्य, प्रवास व अभ्यास ह्या सर्वांची सोय शिष्यवृत्तीच्या रकमेंत होईल. मुदत दोन वर्षांची राहील.

## अवार्ड देण्यापूर्वी आर्बिट्रेटरला फी वसूल करतां येत नाहीं

फर्स्ट नॅशनल बँक, अंबाला, मेसर्स बेरी ब्रदर्स आणि श्री. तुळसीराम यांनीं करार करून आपसांतील झगडा दिवाण राम किशन खोलसा, ॲडव्होकेट या अर्बिट्रेटरकडे सोंपविला. करारामध्यें असें ठरविलें होतें कीं, अवॉर्डला लागणारा स्टँप आणि अर्बिट्रेटरची फी उभयपक्षांनीं द्यावी. अर्बिट्रेटरच्या फीची रक्कम आणि प्रत्येक पक्षानें त्यापैकी किती रक्कम द्यावयाची हें मात्र करारामध्यें नमूद केलें नव्हतें.

अर्बिट्रेटरनें अवॉर्ड दिला. त्यामध्यें असें म्हटलें होतें कीं, बँकनें २२० रु. अवॉर्डला लागणाऱ्या स्टँपकरितां आणि रजिस्ट्रेशनकरितां खर्च केले आहेत. तसेंच अर्बिट्रेटरची फी ५०० रुपये दिली आहे. हा खर्च उभयपक्षांनीं द्यावयाचा असें ठरलें असल्यामुळें त्यापैकी अर्धा खर्च म्हणजे ३६० रु. बेरी ब्रदर्सनीं बँकला द्यावे.

अर्बिट्रेटरनें अवॉर्ड कोर्टात पेश करावा असा हुकूम अर्बिट्रेटरला देण्यांत यावा, असा अर्बिट्रेशन ॲक्ट, कलम १४ खालील अर्ज बँकेनें केला. त्यावर बेरी ब्रदर्सनी त्या कायद्याच्या कलम ३० खालीं हरकत घेतली.

अवॉर्ड देण्यापूर्वीच अर्बिट्रेटरनें आपली फी म्हणून ५०० रुपये बँकेकडून वसूल केले. अर्बिट्रेटरची ही गैरवर्तणूक असून त्यामुळें अवॉर्ड रद्द होऊं शकतो असा निकाल देऊन अव्वल कोर्टानें अवॉर्ड रद्द केला. यावर बँकेनें हायकोर्टांत अपील केलें. अवॉर्ड देण्यापूर्वीच आणि बेरी ब्रदर्सना न सांगतांच अर्बिट्रेटरनें आपली फी म्हणून ५०० रुपये बँकेकडून वसूल केलें. ह्या गोष्टीमुळें अर्बिट्रेटर गैरवर्तणुकीबद्दल दोषी ठरतो किंवा काय हा हायकोर्टापुढें मुख्य प्रश्न होता.

या प्रश्नाचें उत्तर हायकोर्टानें होकारार्थी दिलें.

प्रस्तुत केसमध्यें अर्बिट्रेशनच्या करारांत अर्बिट्रेटरची फी किती आणि त्यांपैकी प्रत्येक पक्षानें किती रक्कम द्यावयाची हें कांहींच ठरलें नव्हतें. बँकेच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सनीं अर्बिट्रेटरला ५०० रुपये फी द्यावी असा ठरावहि पास केला नव्हता. अशा परिस्थितींत अवॉर्ड देण्यापूर्वीच अर्बिट्रेटरनें बँकेकडून आपली फी म्हणून ५०० रुपये वसूल करणें योग्य नव्हतें. अर्बिट्रेटरची ही गैरवर्तणूक ठरते आणि त्यामुळें अवॉर्ड रद्द होऊं शकतो असा निकाल देऊन हायकोर्टानें अपील फेटाळून लावलें.

अवॉर्ड देण्यापूर्वीच जर अर्बिट्रेटरनें आपली फी म्हणून कांहीं रक्कम एका पक्षाकडून वसूल केली तर अर्बिट्रेटरची ती गैरवर्तणूक ठरेल आणि त्यामुळें अवॉर्ड रद्द ठरूं शकेल.

---

### जपानी स्त्रियांचा दौरा

सहा जपानी स्त्रिया आग्नेय आशियांतील बाजारपेठांची पहाणी करण्यासाठीं टोकियोहून दि. १७ रोजीं निघाल्या आहेत. ह्या सर्व स्त्रिया व्यापारी किंवा कारखानदारी फर्म्सच्या मॅनेजर, डायरेक्टर किंवा अध्यक्ष अशा आहेत. भारत, थाइलंड, फिलिपाइन्स व इतर आग्नेय आशियांतील देश ह्यांचा दौरा पुरा करून त्या मार्चअखेर जपानला परत जातील.

## पुढे पाऊल

(लेखक व प्रकाशक—श्री. वा. काळे, दुर्गाधिवास पुणें ४. किं. २ रु.) सामाजिक चर्चेस क्षुल्लक वाटणाऱ्या पण कौटुंबिक सुखसाधनेच्या दृष्टीनें महत्त्वाच्या अशा कौटुंबिक गोष्टींची चर्चा करणारें 'कण आणि क्षण' हें प्रस्तुत लेखकाचें पुस्तक बरेंचसें गाजलें. त्याच्या गुजराथी व हिंदी आवृत्त्याहि निघाल्या व त्या त्या भाषिकांत त्याची प्रशंसाहि झाली. या नव्या पुस्तकांत व्यक्ति, कुटुंब व समाज ह्यांच्या विरोधींहि गरजांचा व हितसंबंधाचा मेळ कसा घालतां येईल हें दाखविण्याचा लेखकाचा प्रयत्न आहे. तरुण पिढीचें वर्तन, म्हाताऱ्यांची कटकट, वर-संशोधनाची आर्थिक मीमांसा, पाहुणे व यजमान, असे निरनिराळे व कौटुंबिक महत्त्वाचे विषय त्यांनीं घेतले आहेत व जशी तरुणांच्या व्यक्तित्व-रक्षणाची मागणी केली आहे तशीच वृद्धांच्याहि. मिश्र जीवनांतील खांचखळगे दाखवून होतकरू पिढीला सावध केले आहे. काटकसरीकडे पाहण्याची नवी दृष्टि गृहस्थाश्रमीयांना प्राप्त करून दिली आहे. लेखकाची भाषा ओघवती व शैली मनोवेधक आहे. लेखकाचें व्यवहारज्ञान, सूक्ष्म निरीक्षण व व्यापक दृष्टि यांची प्रचीति पुस्तकांत पदोपदीं येते. कुटुंबियांनीं हें पुस्तक जरूर वाचलें पाहिजे. कारण, प्रत्यहीं आपणांपुढें येणाऱ्या समस्यांकडे पाहण्याची एक नवी समतोल दृष्टि त्यामुळें त्यांना लाभेल. —"स्त्री," मार्च, १९५७

### किरणोत्सर्गी द्रव्यांचा परिणाम होऊं लागला?

अणु व हैड्रोजन बॉम्बचे प्रायोगिक स्फोट केल्यामुळें मानवजातीच्या भावी पिढ्यांवर अनिष्ट परिणाम होतील, असें भाकित कांहीं अणुशास्त्रज्ञांनीं केलें होतें. हे परिणाम दिसून येण्याइतकें किरणोत्सर्गी द्रव्य पृथ्वीच्या वातावरणांत भिनण्यास अजून अवकाश आहे असें उलट उत्तर कांहीं अणुशास्त्रज्ञांनीं दिलेलें आहे. पण ब्रिटनमधील चेल्टनहॅम ह्या शहरांत जन्मास येणाऱ्या मुलांचा आकार लहान होऊं लागल्याचें दृष्टोत्पत्तीस आल्यामुळें ब्रिटिश डॉक्टर्स आतां काळजीपूर्वक तपास करूं लागलें आहेत. चेल्टनहॅम हें शहर लंडनच्या वायव्येला सुमारें शंभर मैलांवर असून त्याची लोकसंख्या ५ लाखांच्या जवळपास आहे. १९५० सालापासून ह्या शहरांत जन्मास येणाऱ्या मुलांचा आकार लहान होऊं लागल्याचें दिसून आलें. पण ह्यासंबंधीं नोंदी ठेवण्यांत आलेल्या नाहींत. चेल्टनहॅम शहरांत गंधकमिश्रित उन्हाळीं असून त्यामधील पाण्यावर अणुस्फोटामुळें उत्पन्न झालेल्या किरणोत्सर्गी द्रव्याचा परिणाम झाला असावा असें सूचित करण्यांत येत आहे. नेहमींपेक्षा कमी वजन भरणाऱ्या मुलांच्या संख्येंत बरीच वाढ झालेली आहे. कांहीं मुलें तर अवघी २ पौंड वजनाचीच जन्माला आलेली आहेत. १९५४ सालीं एका सूतिकागृहांत २३ मुलें जन्माला आलीं त्यांचें वजन प्रत्येकीं अवघें ३॥ पौंड भरलें. ह्या प्रकरणाचें संशोधन करण्यासाठीं तज्ज्ञांची एक कमिटी नेमण्यांत आली. त्यांनीं दोन वर्षें ह्या रहस्याचा शोध लावण्याचा प्रयत्न केला. पण अजून निश्चित अशा कारणांवर त्यांना बोट ठेवतां आलेलें नाहीं.

---

### कल्याण पॉवर हाऊस

रेल्वे बोर्ड मुंबई सरकारकडून कल्याण पॉवर हाऊस विकत घेणार आहे. त्याची किंमत ३·७४ कोटी रुपये मुंबई सरकारला मिळतील.

# अर्थ

बुधवार, ता. २७ मार्च, १९५७





संस्थापक :
श्री. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## अंथरूण पाहून पाय पसरा

"भारताच्या पंचवार्षिक योजनेचीं लक्ष्यें आवाक्या पलीकडचीं आहेत कीं काय, असा प्रश्न विचारावासा वाटतो. वाढत्या लोकसंख्येचा रहाणीचा दर्जा सुधारण्याची गरज महत्त्वाची व तातडीची आहे, हें अर्थात् गृहीतच आहे. परंतु, कोणत्याहि पंचवार्षिक योजनेनें देशाच्या आर्थिक संसारावर इतका ताण पडूं नये, कीं त्यामुळें तो संसारच मोडून पडण्याची भीति वाटावी! भारतांत आज जें कांहीं घडत आहे, त्याचें स्वरूप अशा प्रकारचें असण्याचा संभव आहे. गेल्या कांहीं महिन्यांत पोलाद व यंत्रसामुग्री ह्यांची भारतानें फार मोठ्या प्रमाणावर आयात केली आहे, त्यामुळें निर्गतीचे मानानें आयातीची किंमत भरमसाट झाली आहे. सहाजीकच, परराष्ट्रीय हुंडणावळीचा संचय धोकादायक वाटण्याइतका कमी होऊं लागून, पंचवार्षिक योजनेंतील आणखी भांडवली माल-खरेदीस वावच उरणार नाहीं. माझे हे उद्गार फारच निराशाजनक नाहींत, अशी मी आशा बाळगतों. भारताजवळ माणसें व संपत्ति ह्यांची 'गंगाजळी' भरपूर आहे; तिचा योग्य वापर केला तर लोकांची परिस्थिति सुधारूं शकेल. परंतु, हें अत्यंत इष्ट असें उद्दिष्ट, अति वेगानें सुधारणा घडवून आणण्याच्या खटपटीमुळें साध्य होऊं शकलें नाहीं आणि चलनाच्या स्थैर्यास धोका निर्माण झाला, तर त्याचे परिणाम भयंकर होतील." चार्टर्ड बँकेचे चेअरमन, श्री. व्ही. ए. ग्रँथॅम ह्यांच्या वार्षिक आढाव्यांतील उतारा येथें दिला आहे, त्यावरून ब्रिटिश एक्सचेंज बँकेच्या ह्या प्रमुखाचें भारताच्या सध्यांच्या आर्थिक धोरणाबद्दलचें मत लक्षांत येईल. त्यांनीं दिलेली भयसूचना अर्थातच विचारांत घेतली जाणें आवश्यक आहे.

पाकिस्तानासंबंधीं श्री. ग्रँथॅम म्हणतात, कीं गेल्या वर्षी त्या देशाला परराष्ट्रीय हुंडणावळीचा तुटवडा फारच तीव्रनें जाणवला आणि अमेरिकेच्या मदतीच्या अभावीं त्या देशाची स्थिति अतिशयच बिकट झाली असती. १९५६ च्या प्रारंभीं, पाकिस्तानची हुंडणावळ परिस्थिति अधिक बिकट होत जाणार नाहीं, अशी आशा वाटण्यास जागा निर्माण झाली होती. परंतु, पाकिस्तानमध्यें अन्नाचा तीव्र तुटवडा असल्याचें ऑक्टोबरमध्यें स्पष्ट दिसून आलें. पूर्व व पश्चिम, पाकिस्तानच्या दोनहि भागांत अन्नाची मोठ्या प्रमाणावर आयात करावी लागली. पुनः अशीच तातडीची गरज निर्माण होऊं नये, ह्यासाठी पाकिस्ताननें अन्नधान्यांच्या उत्पादनास प्रोत्साहन दिलें पाहिजे. पूर्वी औद्योगीकरणावर पाकिस्तानचा भर होता; प्रसिद्ध झालेल्या त्याच्या पंचवार्षिक योजनेंत शेती सुधारणेकडे अधिक लक्ष दिलेलें आहे.

गेल्या वर्षी ब्रह्मदेश सर्व शिलकी तांदूळ निर्गत करूं शकला; १९५३ पासूनचे साठे त्यामुळें संपूं शकले. १९५६ मध्यें एकूण २० लक्ष टन ब्रह्मी तांदळाची निर्गत झाली. दुसऱ्या महायुद्धानंतर एवढी निर्गत त्यानें कधींच केली नव्हती. निर्गतींत वाढ, आयातीवर नियंत्रणें व सरकारी खर्चांत बचत, ह्यांमुळें गेल्या वर्षी ब्रह्मदेशाच्या परराष्ट्रीय हुंडणावळीची परिस्थिति सुधारली.

सीलोनची भांडवली साहित्याची आयात बरीच वाढली, पण निर्गतींत वाढ न झाल्यानें परराष्ट्रीय हुंडणावळीचा सांठा कमी झाला.

मलाया व सिंगापूर ह्यांना गेलें वर्ष भरभराटीचें गेलें. मलायाला ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वायत्तता मिळणार असून सिंगापूरला अशीच स्वायत्तता मिळण्याचा रंग दिसत आहे. देश स्वतंत्र झाले, म्हणजे त्यांतील परदेशी बँकांवर त्याचा परिणाम होणें स्वाभाविक असतें, आणि बँकांना आपले व्यवहार नव्य सरकारशीं मिळते करून घ्यावे लागतात.

---

## भारतामधील बंदरांच्या विकासासाठी मदत

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत भारतामधील रेल्वेवहातुकीचा व बंदरांचा विकास करण्याची कामगिरी करण्याचें मध्यवर्ती सरकारनें ठरविलें आहे. हीं कामें योग्य रीतीनें पार पाडण्यासाठी भारताला तांत्रिकदृष्ट्या प्रगत असलेल्या देशांकडून मदत घ्यावी लागणार आहे. अमेरिकेसारख्या उद्योगप्रधान देशांकडून जरूर ती मदत मिळविण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत. भारत सरकारनें रेल्वेच्या व बंदरांच्या विकासाचा जो कार्यक्रम आखला आहे त्याची तपासणी व अभ्यास करण्यासाठी जागतिक बँकेचे दोन प्रमुख प्रतिनिधी सध्यां भारताच्या दौऱ्यावर आले आहेत. त्यांनीं आपल्या मुंबईच्या मुक्कामांत ईस्टर्न शिपिंग कॉर्पोरेशनचे अध्यक्ष मि. सी. एच्. भाभा ह्यांच्याशीं सागरी वहातुकीबद्दल प्राथमिक चर्चा केली. हें कॉर्पोरेशन सरकारच्या मालकीचें आहे. मुंबई येथील वाटाघाटीनंतर बँकेचे प्रतिनिधी दिल्लीला रवाना झाले. चालू वर्षांत बँकेकडून भारतांत आलेलें हें दुसरें प्रतिनिधी मंडळ आहे. गेल्या महिन्यांत मि. जॉन स्लेटर ह्यांच्या नेतृत्वाखाली पहिलें प्रतिनिधी मंडळ भारतांत आलें होतें. भारतामधील रेल्वे जंक्शन्स आणि गाड्या जोडण्या-मोडण्याचीं ठिकाणें ह्यांचा अभ्यास करण्यासाठी हें मंडळ आलें होतें. परदेशाहून आयात करण्यांत येणाऱ्या यंत्रसामुग्रीची वहातूक कार्यक्षम रीतीनें होण्यासाठी रेल्वे-रस्त्यांचा जो विकास करण्यांत येणार आहे, त्यासंबंधींची पहाणी ह्या मंडळाला करावयाची होती. हीं दोन्हीं प्रतिनिधी मंडळें आपआपल्या कामासंबंधींचा अहवाल जागतिक बँकेला सादर करतील आणि त्यांचा विचार करून रेल्वे व बंदरांच्या विकासासाठी किती कर्ज द्यावें तें बँक ठरवील.

भारत सरकारनें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत जीं आठ मोठालीं कामें हातीं घेण्याचें ठरविलें आहे त्यांत रेल्वे व बंदरांच्या विकासाचें एक काम आहे. सर्वच कामासाठी आर्थिक साह्य देण्याचा विचार करण्याचें आश्वासन बँकेकडून मिळालेलें आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत देशांतील मोठ्या बंदरां-

च्या विकासासाठी ७६ कोटी रुपये खर्च करण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. हें काम करण्यासाठी जितकी परदेशीय हुंडणावळ लागेल तितकी मदत जागतिक बँकेनें द्यावी असें सरकारचें म्हणणें आहे. भारत सरकारचें वहातूक खातें नक्की किती परदेशीय चलन लागेल तें अजमावण्याचें काम करीत आहे. एकूण ७६ कोटी रुपयांपैकी २९·३ कोटी इतकी रक्कम मुंबई बंदराच्या विकासासाठी खर्च करण्यांत यावयाची आहे. १९·९ कोटी रुपये कलकत्ता येथील बंदराच्या सुधारणेसाठी खर्च करण्यांत येणार आहेत. कांडला बंदरावर १४ कोटी रुपये, मद्रास बंदरावर ९·२ कोटी रुपये आणि कोचीन बंदरावर ४ कोटी रुपये खर्च करण्यांत यावयाचे आहेत. मुंबई बंदरांतील प्रिन्सेस व व्हिक्टोरिआ गोद्यांचा विस्तार करण्यांत येणार आहे. बंदरांत येण्याचा जो मुख्य जलमार्ग आहे, त्याच्या तळाशीं वाळू साचून तो उथळ झालेला आहे. पुष्कळ वर्षांत हा जलमार्ग साफ करण्याचें काम झालेलें नाहीं. हें काम आतां करण्यांत येईल. त्याशिवाय, यान्त्या विजेवर चालण्याची सोयहि करण्यांत येणार आहे.

---

### नॅशनल इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन

नॅशनल इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनची स्थापना, खासगी लिमिटेड कंपनी म्हणून, भारत सरकारनें केली. तिच्या नांवांतील डेव्हलपमेंट हा शब्द उद्बोधक आहे. ह्या संस्थेचा भर कर्जपुरवठ्यावर नसून, उद्योगधंद्यांच्या विकासावर आहे. औद्योगिक कर्जपुरवठा करणाऱ्या इतर संस्था व ही संस्था ह्यांमध्यें हा महत्त्वाचा फरक आहे. १ कोटी रुपयांच्या अधिकृत भांडवलानें तिची स्थापना झाली. व सरकारनें १० लक्ष रुपयांचें भांडवल विक्रीस काढून तें सर्व सरकारनें घेतलें. प्लॅनिंग कमिशननें ह्या कॉर्पोरेशनच्या कार्यासाठी ५५ कोटी रुपये मंजूर केले आहेत. सरकारचें जणुकाय एक खातेंच, अशी ह्या कॉर्पोरेशनची योजना असून उद्योगधंद्यांचा समतोल विकास घडवून आणण्याची कामगिरी त्याच्याकडे सोंपविलेली आहे. ज्या ठिकाणीं खाजगी भांडवलदार शिरकाव करण्यास सहजीं तत्पर होत नाहींत, अशा क्षेत्रांत पाऊल टाकण्यास मार्गदर्शन करणें, हें कॉर्पोरेशनचें काम आहे; अशा उपक्रमांना आर्थिक साहाय्य करणें हें आनुषंगिक आहे. कॉर्पोरेशनच्या प्रोत्साहनानें निघालेल्या उद्योगधंद्यांमुळें इतर दुय्यम उद्योगधंदे आवश्यक होतील व ते काढण्यास खाजगी भांडवलदार पुढें येऊं शकतील.

कपास व ताग ह्यांच्या गिरण्यांना देशाच्या आर्थिक संसारांत, विशेषतः परदेशी हुंडणावळ मिळवून देण्याच्या कामीं, महत्त्वाचें स्थान आहे. ह्या धंद्यांच्या आधुनिकीकरणासाठी व प्रगतीसाठी कॉर्पोरेशननें सुमारें २० ते २५ कोटी रुपये बाजूस काढून ठेवलें आहेत.

---

**गिरण्यांना कोळशाचा तुटवडा**—अहमदाबादमधील कापडाच्या गिरण्यांना कोळशाच्या तुटवड्यास तोंड द्यावें लागत आहे. देशाच्या कापडाच्या गरजेपैकीं एकचतुर्थांश गरज अहमदाबादच्या गिरण्या भागवितात. शहरांतील ६६ गिरण्यांपैकी ४३ गिरण्यांजवळ फक्त ५ दिवस पुरेल इतकाच कोळशाचा साठा मार्चच्या तिसऱ्या आठवड्यांत होता.


खर्चात बचत करा व पैसा शिलकीत टाका

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

सोनें व सोन्याचे दागिने यांच्या तारणावर माफक दरानें कर्जे दिलीं जातात.

शाखा: फोर्ट, दादर, माहिम, पुणें, बेळगांव.

---

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी

लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था

सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

---


कण आणि क्षण

( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

लेखक:—श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"

मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.

---



किर्लोस्कर

अिलेक्ट्रिक पंपिंग सेट

यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाळ टिकाऊ.

आपल्या पिकांची जोपासना करण्यासाठीं एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारकपणें काम करीत आहेत.

सविस्तर माहितीसाठीं लिहा.

किर्लोस्कर ब्रदर्स लि., किर्लोस्करवाडी, द. सातारा

## भडोच डिस्ट्रिक्ट सॅ. को. बँक लि. चा सुवर्णमहोत्सव

वरील बँकेचा सुवर्णमहोत्सव भडोच येथें सोमवार, दि. १५ एप्रिल, १९५७ रोजीं श्री. आर. जी. सरय्या, बाँबे स्टेट को. बँक लि. चे चेअरमन, ह्यांच्या अध्यक्षतेखालीं होणार आहे. कै. सरदार रा. ब. मोतीलाल चुनीलाल देसाई ह्यांनीं बँकेच्या स्थापनेंत पुढाकार घेतला होता आणि कै. दि. ब. अंबाशंकर मुळजी प्रभृतींनीं बँकेची जोपासना केली. ऑल इंडिया रूरल क्रेडिट सर्व्हे कमिटीच्या अहवालाप्रमाणें 'पायलट प्रॉजेक्ट'साठीं ह्या बँकेची निवड झाली आहे.

बँकेच्या पटावर ३५५ सोसायट्या व १,४७८ व्यक्ती सभासद असून वसूल भांडवल १७,४८,००० रु., रिझर्व्हज ८,७८,४०० रु. व खेळतें भांडवल १,५४,५८,००० रु. आहे. बँकेनें दिलेल्या कर्जाची रक्कम १ कोटी, ५८ लक्ष रु. आहे. (रिझर्व्ह बँकेनें ५० लक्ष रु. पीक कर्जें व मार्केटिंग कर्जें ह्यांसाठीं मंजूर केलें आहेत) वसुली समाधानकारक आहे; थकबाकीचें प्रमाण गेलीं दहा वर्षें २% पेक्षाहि कमी आहे.

(प्रेसिडेंट : श्री. यशवंतराव आर. जोशी, बी. एजी. चेअरमन : श्री. छोटुभाई एस. पटेल. मॅनेजर : श्री. जी. एल. पारीख, बी. ए., सी. ए. आय. आय. बी.)

---

## खादी आणि ग्रामोद्योग बोर्डाचा अहवाल

अखिल भारतीय खादी आणि ग्रामोद्योग बोर्डाची सभा दिल्ली येथें नुकतीच भरली होती. बोर्डाचे अध्यक्ष श्री. वैकुंठराय मेहता ह्यांनीं बोर्डानें ४ वर्षांत केलेल्या कामाचा अहवाल सभेला सादर केला. अहवालांत दिलेल्या माहितीवरून असें दिसून येतें कीं गेल्या चार वर्षांत बोर्डानें पूर्ण वेळ कामावर घेतलेल्या लोकांच्या संख्येंत वाढ झालेली आहे. १९५३–५४ सालीं बोर्डानें ४ लाख लोकांना पूर्ण वेळाच्या नोकऱ्या दिल्या होत्या. १९५६–५७ सालीं असा पूर्ण रोजगार दिल्या गेल्याची संख्या तिप्पटीनें वाढली. ह्या सालीं १२ लाख लोकांना संपूर्ण रोजगार देण्यांत आला. खादीचा धंदा सोडून इतर धंद्यांचा विकास करण्याच्या योजना बोर्डानें तयार केल्या आहेत. भारताच्या मध्यवर्ती नियोजनसमितीनें ह्या धंद्यांना आर्थिक मदत देण्याचें मंजूर केलेलें आहे. मंजूर केलेली मदत दरसाल देण्यांत येईल अशी अपेक्षा अहवालांत व्यक्त करण्यांत आली आहे. पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसंबंधीं जो अहवाल करण्यांत आलेला आहे त्यांत ग्रामोद्योगासंबंधीं कांहीं शिफारशी करण्यांत आलेल्या आहेत. ह्या शिफारसी लक्षांत घेऊन ग्रामोद्योगांपैकीं कांहीं उद्योगधंद्यांना सामायिक असा एक उत्पादनाचा कार्यक्रम आखण्याचा प्रयत्न अहवालांत करण्यांत आला आहे. उत्पादनाचीं क्षेत्रें निश्चित करण्याविषयीं आणि त्या क्षेत्रांतील मोठ्या प्रमाणावरील उद्योगधंद्यांच्या विस्तारावर बंधनें घालण्याच्या सूचना करण्यांत आल्या होत्या. ह्या धोरणविषयक सूचनांचा मध्यवर्ती सरकार विचार करील, अशी बोर्डाची अपेक्षा आहे.

## ब्रह्मदेशाच्या आर्थिक परिस्थितींत सुधारणा

दुसऱ्या महायुद्धांत आशिआंतील सर्वच देशांची आर्थिक परिस्थिति खालावली. परंतु ज्या देशांत शत्रूंच्या लष्करानें आपला अंमल बसवला त्या देशांची परिस्थिति अधिकच चिंताजनक झाली. भारताचा शेजारी ब्रह्मदेश ह्याला युद्धाची प्रत्यक्ष झळ लागल्यानें तेथील उत्पादनाची व्यवस्था संपूर्णपणें ढासळली होती. परंतु आतां १२ वर्षांनंतर तेथील परिस्थिति लक्षांत येण्यासारखी सुधारू लागली आहे. सीलोनचे ब्रह्मदेशांतील वकील ह्यांनीं ह्या बाबतींत कांहीं माहिती प्रकट केली आहे. ते म्हणतात कीं ब्रह्मदेश आतां आर्थिक प्रगतीच्या मार्गावर पावलें टाकूं लागला आहे. युद्धापूर्वीच्या काळापेक्षा ब्रह्मदेशमधील तांदुळाचें उत्पादन बरेंच वाढलें आहे. देशाच्या गरजा भागवून ब्रह्मदेश शिलकी तांदूळ निर्यात करतो. ह्या निर्यातीमुळें त्या देशाला जरूर तें परदेशीय चलन मिळूं शकतें. ब्रह्मदेशांतील तांदुळाच्या उत्पादनांत तर वाढ झालीच आहे पण त्याच्या दर्जांतहि सुधारणा झाली आहे. सीलोन ब्रह्मदेशाकडून दरसाल २,००,००० टन तांदूळ आयात करतो. तितकाच तांदूळ चीनकडूनहि आयात करण्यांत येतो. तांदुळाचें उत्पादन वाढविण्यासाठीं ब्रह्मदेशाचें सरकार शेतकऱ्याला प्रलोभनें दाखवीत आहे. सरकारनें लावलेल्या या आर्थिक आमिषाचा चांगला उपयोग होत आहे. एका ब्रिटिश तेल कारखान्याच्या सहकार्यानें ब्रह्मी सरकार तेलाचा कारखाना काढण्याच्या खटपटींत आहे. हा कारखाना कंपनीच्या व सरकारच्या संयुक्त मालकीचा राहील. कारखाना काढण्यांत यश येऊन तो चालू झाल्यावर ब्रह्मदेशाची आर्थिक स्थिति आणखी सुधारेल.

---

**मद्रास कॉर्पोरेशनला मदत**—मद्रास येथील प्राणिसंग्रहालयाची सुधारणा व विस्तार करतां यावा म्हणून मद्रासच्या सरकारनें शहराच्या कॉर्पोरेशनला १९५६–५७ ह्या आर्थिक वर्षांत १०,००० रुपयांची मदत मंजूर केली आहे.

**ब्रिटनमधील सर्वांत छोटी मोटार**—ब्रिटनमधील एका मोटारच्या कारखानदारानें छोट्याशा कुटुंबास पुरेल अशा प्रकारची अतिशय छोटी गाडी तयार केली आहे. ह्या गाडीची किंमत सुमारें ३,८०० रुपये असेल. तिचा जास्तींत जास्त वेग तासाला ५० मैल राहील व एका गॅलनच्या जळणावर ती ७५ मैल जाऊं शकेल. दोन मोठीं माणसें व तीन मुलें गाडींत बसूं शकतील.

**सुएझचा कालवा चालू**—कांहीं दिवसांपूर्वी सुएझच्या कालव्यांतून ५०० टन वजनापर्यंतच्या बोटी जाऊं देण्यास सुरवात झाली होती. आतां १,००० टनांपर्यंतच्या बोटींना कालव्याचा उपयोग करतां येऊं लागला आहे. आणखी एक बुडलेली बोट बाहेर काढण्यांत आली कीं १०,००० टन वजनाच्या बोटी कालव्यांतून जाऊं शकतील. हें काम लवकरच पूर्ण करण्यांत येईल.

तमाम दंतरोगांवर

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## रेल्वेजचा अर्थसंकल्प

१९५७–५८ मध्यें रेल्वेचे वाहतुकीपासून होणारें एकूण उत्पन्न ३६८·५० कोटी रु. होईल असा अंदाज करण्यांत आलेला आहे. १९५६–५७ चा दुरुस्त अंदाज ३५० कोटी रु. उत्पन्न असा होता. म्हणजे यंदा १८·५० कोटी रु. वाढ अपेक्षित आहे.

१९५७–५८ मध्यें उतारू वाहतुकीपासून अंदाजें ११९ कोटी रुपये मिळतील. चालू वर्षाच्या दुरुस्त अंदाजांत हा आंकडा ११५·५ कोटी रु. धरलेला आहे. इतर वाहतुकीपासून अंदाजें २४ कोटी रु. मिळतील. चालू वर्षाच्या दुरुस्त अंदाजांत हें उत्पन्न २१·४ कोटी रु. धरलेलें आहे. ह्या २४ कोटी रु. च्या अंदाजांत १ एप्रिल, १९५६ पासून नव्या दरांनुसार होणाऱ्या टपालवाहतुकीपासून अपेक्षित असलेल्या २·२ कोटी रु. च्या समावेश होतो. चालू वर्षाच्या आंकड्यांची मिळवणी देखील १९५७-५८ मध्यें करण्यांत येईल.

### मालवहातूक

१९५७–५८ मध्यें मालाच्या वहातुकींत सुमारें ५ टक्के वाढ अपेक्षित आहे व त्यापासून सुमारें २१८ कोटी रु. उत्पन्न मिळेल असा अंदाज करण्यांत आला आहे. चालू वर्षाच्या दुरुस्त अंदाजांत हें उत्पन्न २०६·५ कोटी रु. धरण्यांत आलेलें आहे. फ्राइट स्ट्रक्चर इन्क्वायरी कमिटीच्या शिफारशीनुसार निर-निराळ्या मालासाठी वेगवेगळे दर सुरू करण्यांत येईपर्यंत चालू ठेवण्यांत येणाऱ्या ६ टक्के पुरवणी आकाराच्या रकमेसुद्धां ही २१८ कोटी रु. रक्कम धरण्यांत आलेली आहे.

किरकोळ बाबींपासून होणाऱ्या उत्पन्नाची सध्यांची दिशा लक्षांत घेतां आणि भोजन व उपाहार विभागांकडून अधिक उत्पन्न होण्याची अपेक्षा असल्यामुळें चालू वर्षाच्या ७·३५ कोटी रु. ह्या उत्पन्नापेक्षा सुमारें ७५ लक्ष रु. अधिक उत्पन्न मिळेल असा अंदाज आहे.

### चालू खर्च

१९५७–५८ मध्यें चालू खर्च २८४·४२ कोटी रु. म्हणजे १९५६–५७ च्या २६८·९८ कोटी रु. या दुरुस्त अंदाजापेक्षा १५·४४ कोटी रु. जास्त धरण्यांत आला आहे. तथापि, माल-वाहतुकीवरील खर्चातील कपात लक्षांत घेतां ही वाढ फक्त १४·८२ रु. झाली आहे.

या अर्थसंकल्पिय वर्षात अपेक्षित अशा उतारू व मालवाह तुकीची गरज भागविण्यासाठी गाड्यांच्या धांवेचें अंतर वाढ-विण्यांत आलें. त्यासाठी ४·६ कोटी रु., वाघिणी, डबे व त्यांच्या दुरुस्तीसाठी ३·३२ कोटी रु. व नोकरवर्गासाठी ९·०३ कोटी रु. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील वाढत्या कामामुळें जास्त धरले आहेत. नोकरवर्गाला वरच्या श्रेणींत बढती देण्याच्या योजनेमुळें १ एप्रिल, १९५६ पासून पगार यावे लागणार असल्यामुळें २·२ कोटींचा खर्च येणार आहे. त्याचबरोबर महसुलीखर्चासाठी १·५१ कोटी रु. कमी धरले आहेत हेंहि लक्षांत घरलें पाहिजे. या खात्याच्या संकीर्ण व्यवहारासाठी एकूण १४·१२ कोटी रु. खर्च येण्याची अपेक्षा आहे.

### सर्वसाधारण महसुलांत जमा केलेली रक्कम

सर्वसाधारण महसुलांत ४३·७९ कोटी रु. रक्कम जमा कर-ण्यांत आली आहे. चालू वर्षाचा हा आंकडा ३७·६९ कोटी रु. होता. हा आंकडा फाळणीनंतर धरण्यांत आलेल्या एकूण भांडवलांत २ कोटी रु. ची मिळवणी करून जमेस धरण्यांत आला. अर्थसंकल्पिय वर्षासाठी (१९५७–५८) भांडवली खर्चाकरतां १२४ कोटी रु. जास्त देण्यांत आलें आहेत.

सर्वसाधारण महसुलासाठी नफ्याची रक्कम दिल्यानंतर १९५७–५८ सालीं निव्वळ शिल्लक २१·४३ कोटी रु. राहाते. ही रक्कम विकासनिधीसाठी देण्याचा विचार आहे.

### दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील खर्च

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत रेल्वेसाठी एकूण १,१२५ कोटी रु. देण्यांत आलें आहेत. त्यांपैकी १७८ कोटी रु. पहिल्या वर्षांत खर्च होईल असा अंदाज आहे. योजनेच्या दुसऱ्या वर्षासाठी म्हणजे १९५७–५८ करतां २१८ कोटी रु. ची तरतूद करण्यांत आली असून त्यामधून रेल्वे डबे, यंत्रसामुग्री, इतर कामें व बांधकामें यांच्यावर खर्च करण्यांत येईल.

### १९५५–५६ चे पक्के हिशेब

श्वेतपत्रिकेनुसार असें दिसून येतें कीं, १९५५–५६ मध्यें वाहतुकीपासून एकूण ३१६·२९ कोटी रु. उत्पन्न झालें. त्या वर्षाच्या दुरुस्त अंदाजापेक्षा हा आंकडा २·१९ कोटी रु. नीं जास्त आहे.

या वर्षाचा शिलकीचा आंकडा १४·२२ कोटी रु. वर गेला. शिलकीचा दुरुस्त अंदाज ९·५८ कोटी रु. होता. या शिलकी-पैकी ७·१४ कोटी रु. रेल्वे राखीव निधीसाठी व बाकीचे ७·०८ कोटी रु. विकासनिधीसाठी देण्यांत आले.

### १९५६–५७ चें दुरुस्त अंदाज

उतारू वाहतुकींत चालू वर्षांत धीमेंधीमें वाढ होत गेल्याचें श्वेतपत्रिकेंत म्हटलें आहे. उतारू वहातुकीपासून होणाऱ्या उत्पन्नांत अर्थसंकल्पांतील १११·४ कोटी रु. वरून ११५·५ कोटी रु. पर्यंत वाढ झाली. मालवाहतुकीपासून गेल्या वर्षापेक्षा उत्पन्नांत ८ टक्के वाढ होईल, हा अंदाज खरा ठरला आहे. टर्मिनल चार्ज सारखा केल्यानें आणि ऑक्टोबर १९५६ अखेर-पासून कोळशावर शॉर्ट–डिस्टन्स चार्ज लागूं केल्यानें उत्पन्नांत ९० लक्ष रु. वाढ होण्याची अपेक्षा आहे. त्यामुळें माल-वाहतुकीपासून होणाऱ्या उत्पन्नाचा दुरुस्त अंदाज २०६·५ कोटी रु. म्हणजे अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा १ कोटी रु. नें जास्त आहे. इतर मार्गांनीं होणाऱ्या उत्पन्नाचा अंदाज ७·३५ कोटी रु. आहे.

१९५६–५७ चे वाहतुकीपासून एकूण उत्पन्न ३५० कोटी रु. म्हणजे अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा ५ कोटी रु. नें जास्त आहे. उतारू वाहतुकीपासून प्रामुख्यानें हें उत्पन्न वाढलें आहे.

१९५६–५७ मध्यें चालू खर्चासाठी अर्थसंकल्पांत २६२·०५ कोटी रु. धरले होते, तर खर्चाचा दुरुस्त अंदाज २८८·९८ कोटी रु. वर गेला. ही वाढ कारभार, दुरुस्ती, जळण व कामगार कल्याणकार्य, इत्यादींमुळें झाली आहे.

इतर खर्च ११·०२ कोटी रु. झाला. अर्थसंकल्पीय अंदाज १२·०४ कोटी रु. होता.

१९५६–५७ मध्यें ६४·६४ कोटी रु. रेल्वेच्या शिलकी पड-ल्याचा अंदाज आहे. पैकी सर्वसाधारण महसुलासाठी नफा म्हणून ३७·६९ कोटी रु. असून निव्वळ शिल्लक २६·९५ कोटी रु. आहे. ही रक्कम सर्वस्वीं विकासनिधिकरतां देण्यांत येत आहे.

### पहिली पंचवार्षिक योजना

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या मुदतींत रेल्वेचा प्रत्यक्ष खर्च ४२३·७३ कोटी रु. झाला असल्याचें सदर श्वेतपत्रिकेंत म्हटलें आहे. तरतुद मात्र ४०० कोटी रु. ची होती. खर्चातील वाढ

डबे, वाघिणी, इंजिनें व यंत्रसामुग्री याप्रीत्यर्थ झाली. रेल्वेमार्ग आणि पूल यांवरील सर्च ठरल्यापेक्षा कमी झाला व त्यास सामुग्रीची टंचाई हें कारण प्रमुख आहे. इतकेंच नव्हे तर योजनेच्या अखेरीस रेल्वेमार्गाच्या नूतनीकरणाचें काम बरेंचसें उरकावयाचेंच बाकी होतें. रेल आणि स्लीपर यांचे याबाबतचें बाकी काम प्रत्येकी ७,००० मैलांचें होतें.

पंचवार्षिक योजनेच्या काळांत अवलंबिलेल्या विविध उपायां-मुळें रेल्वेच्या व्यवहारांतील कार्यक्षमतेंत सर्वसाधारण सुधारणा झाली. हा मुद्दा आंकडेवारी देऊन श्वेतपत्रिकेंत स्पष्ट करण्यांत आलेला आहे.

योजनेच्या कालावधींत वाहतुकीच्या उत्पन्नांत ६९ कोटी रु. ची वाढ दिसून आली. १९५०–५१ मध्यें हें उत्पन्न २४७ कोटी रु. ( रेल्वे सामुग्रीवरील भाडें वगळून ) होतें तें योजनेच्या शेवटच्या वर्षापर्यंत वाढत जाऊन ३१६ कोटी रु. झालें.

योजनेच्या मुदतींत चालू खर्चांतहि सुमारें ४८ कोटी रु. वाढ दिसून आली. १९५०–५१ मधील हा आंकडा सुमारें १६५ कोटी रु. होता. ( रेल्वे–सामुग्रीवरील भाड्याचें उत्पन्न वगळून ) तो वाढून २१२·९५ कोटी रु. झाला. नोकरवर्गावरील खर्चांत सुमारें ३४॥ कोटी रु. नीं व जळणावरील खर्चांत ३॥ कोटी रु. नीं वाढ झाल्यानें चालू खर्चांत वाढ झाली.

पंचवार्षिक योजनेच्या काळांत एकूण ४२३·७३ कोटी रु. खर्च झाला. त्यापैकी २८४ कोटी रु. आपल्या चालू उत्पन्नांतून रेल्वेनीं दिले. मूळ योजनेनुसार रेल्वेकडून खर्चासाठी वास्तविकपणें ३२० कोटी रु. मिळावयाचे होते. म्हणजे ३६ कोटी रु. कमी पडले. उरलेलें १४० कोटी रु. कोटी रु. सर्वसाधारण महसुलांतून पुरें करण्यांत आलें.

## दुसरी पंचवार्षिक योजना

रेल्वेसाठी दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या वर्षांत झालेल्या प्रगतीची आणि दुसऱ्या वर्षांतील संकल्पित विकास-कार्याची या श्वेतपत्रिकेंत अधिक तपशीलवार माहिती देण्यांत आलेली आहे.

रेल्वेच्या योजनेंत अंतर्भूत केलेल्या अनेक नव्या मार्गांचीं कामें चालू वर्षांत सुरू करण्यांत आलेली आहेत. १९५७–५८ च्या कार्यक्रमांत त्यांचा समावेश केलेला आहे.

योजनेच्या काळांत इंजिनें, डबे व वाघिणी मिळविण्याबाबत केलेल्या संकल्पानुसार त्यासंबंधांत प्रगति आहे. चालू वर्षांत ५५७ इंजिनें, १,९३१ डबे व २७,१८४ वाघिणी (चार चाकी) यासाठी मागण्या नोंदविलेल्या असून १९५७–५८ च्या कार्य-क्रमांत ४११ इंजिनें, २,३४६ डबे ( ६८ इ एम यू डबे धरून ) व १७,७२९ वाघिणी ( चार चाकी ) यासाठी मागण्या नोंदवि-लेल्या मागण्यांत प्रत्येकी २,००० अश्वशक्तीचीं १०० डिझेल एंजिनें समाविष्ट आहेत. मेन लाईनवरील माल वाहतुकीसाठी ती वापरण्यांत येतील.

इंजिनें, डबे व वाघिणी यांची संख्या वाढत असून व पुढेंहि सतत वाढणार असल्यानें त्यांच्या दुरुस्तीचीं कामें पुरीं करण्या-साठी सध्यांच्या दुरुस्ती कारखान्यांचा विस्तार व आधुनिकी-करण करण्याचे व नवे दुरुस्ती कारखाने उभारण्याचें काम हातीं घेण्यांत येत आहे.

रेल्वेमार्गांच्या विद्युतीकरणासाठी दुसऱ्या योजनेंत ८० कोटी रु. ची तरतूद करण्यांत आलेली आहे.

चालू वर्षांत दक्षिण, पूर्व, पश्चिम व आग्नेय अशा चार रेल्वेच्या कक्षेंतील एकूण ८७ मैल लांबीच्या तीन नव्या मार्गांची बांधणी पुरी झाली असून, आठ मार्गांचीं कामें अद्यापि चालू आहेत.

### रेल्वे अर्थसंकल्प
( आंकडे कोटी रुपयांत )

| | पक्का हिशेब १९५५-५६ | अंदाज १९५६-५७ | दुरुस्त अंदाज १९५६-५७ | अंदाज १९५७ ५८ |
|---|---|---|---|---|
| वाहतुकीचें एकूण उत्पन्न | ३१६·२९ | ३४५·०० | ३५०·०० | ३६८·५० |
| चालू खर्च | २१३·२२ | २२४·३० | २२९·३४ | २४४·१६ |
| निव्वळ किरकोळ खर्च | ७·७३ | १३·०४ | ११·०२ | १४·१२ |
| घसारा राखीव निधींत जमा | ४५·०० | ४५·०० | ४५·०० | ४५·०० |
| एकूण | २६५·९५ | २८२·३४ | २८५·३६ | ३०३·२८ |
| रेल्वेचें निव्वळ उत्पन्न | ५०·३४ | ६२·६६ | ६४·६४ | ६५·२२ |
| सर्वसाधारण महसुलांत जमा | ३६·१२ | ३९·६७ | ३७·६९ | ४३·७९ |
| निव्वळ शिल्लक | १४·२२ | २२·९९ | २६·९५ | २१·४३ |

### त्रावणकोर–कोचीन मधील बँका

पूर्वीच्या त्रावणकोर–कोचीन राज्यांतील २८ बँकांना रिझर्व्ह बँकेनें परवाना नाकारला आहे.

### ३० मार्च व १ एप्रिल रोजीं बँकांना सुट्टी

भारत सरकारनें ३० मार्च व १ एप्रिल हे निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स ॲक्टाखाली सुट्टीचे दिवस जाहीर केले आहेत. दशमान पद्धतीचीं नाणीं सुरू करण्यास सोईचें जावें, ह्यासाठी ह्या सुट्या दिल्या जातील.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.



# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

**हेड ऑफिस : पुणें शहर**

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा,
; श्रीरामपूर, ओझर ( तांबट ) जि. नाशिक,
खोपोली जि. कुलाबा

श्री. के. पां. जोशी ( अध्यक्ष ) | श्री. का. म. महाजन ( उपाध्यक्ष )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १५,४२,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. | ७,९२,८१० |
| वसूल भांडवल | रु. | ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. | १,१४,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ६५,००,०००चे वर |

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर्स



# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.**

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. | ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. | ७७,००० |

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. | न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. | श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी | श्री. बा. ग. घंदुकें.

सरकारी रोखे खरेदी—विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.
दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. २६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी
मॅनेजर.



# दि सांगली बँक लि.

**सांगली.**

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ४,५०,००० |
| रिझर्व्हस् व इतर फंडस् | रु. | ६,२५,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,५०,००,००० |

: शाखा :

रबकवी, तेरदळ, कवठें महांकाळ, शिरहट्टी, विलिंग्डन कॉलेज, मंगळवेढा, शहापूर, उगार, इचलकरंजी, कराड, कोल्हापूर व मुंबई.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.



# दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

**दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक**

शाखाः—१ संकेश्वर, २ होसुर बेळगांव, ३ गोकाक, ४ जयसिंगपूर, ५ वेंगुर्ला, ६ मालवण, ७ नंदगड, ८ गडहिंग्लज, ९ रामदुर्ग, १० चिक्कोडी, ११ सौंदत्ती, १२ बेळगांव, १३ नरगुंद, १४ शिरोडा, १५ चिपळूण, १६ कणकवली, १७ निपाणी, १८ बैलहोंगल, १९ मिरज, २० अथणी, २१ देवगड, २२ ठळकवाडी बेळगांव, २३ सावंतवाडी, २४ बार्शी.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. | २,४६,००० |
| ठेवी | रु. | १,०५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,२०,०,०००० |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतींत अद्ययावत् पद्धतीचा सेफ डिपॉझिट व्हॉल्ट ता. १०।४।१९५३ पासून सुरू आहे. ता. १।९।५४ पासून सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील लॉकर्सचे दर लोकांचे खास सोयीकरितां कमी केले आहेत. तरी सर्वांनीं व्हॉल्टला एक वेळ भेट देऊन, सवलतीचे दराचा अवश्य फायदा घ्यावा.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.